REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018

# भारतातील मत्स्योद्योग आणि त्यासमोरील आव्हाने

**डॉ. के एच. शिंदे[१], नीता मानसिंग पायगुडे[२]**
[१]प्राचार्य, रा..ब. नारायणराव बोरावके कॉलेज, श्रीरामपूर.
[२]पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, प्रा. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय आकुर्डी, पुणे.

## १. प्रस्तावना :-



भारत हा देश अद्यापही शेतीप्रधान देश आहे. तसेच देशात शेतीबरोबरच इतर शेतीपुरक व्यवसायही मोठ्या प्रमाणावर केले जातात जसे पशुपालन, कुक्कुटपालन, मधमाशीपालन, मत्स्योद्योग इत्यादी. यापैकी मत्स्योद्योगाला भारताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान आहे. भारतात समुद्रकिनाऱ्यावर नदीनाल्यांमधून, शेततळ्यांमधून जे पाणी उपलब्ध होते. त्या सर्व पाण्याचा मत्स्यउत्पादनासाठी मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जाऊ शकतो. मत्स्यांमध्ये प्रथिने मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे भारतीय लोकांची अन्नाची गणात्मकता सुधारण्यास मत्स्योद्योगामुळे मदत होते आहे. देशात दरडोई शेतजमिनीची उपलब्धता अतिशय कमी आहे.

त्यामुळे मत्स्योद्योग ग्रामीण व शेतीव्यवसायाच्यादृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. तसेच मत्स्योद्योग श्रमप्रधान असल्यामुळे तो ग्रामीण भागात रोजगार वाढविण्याच्या दृष्टिने उपयुक्त व्यवसाय आहे. तसेच मासेमारी उद्योगासाठी मोठ्या भांडवालाची व प्रशिक्षणाची गरज नसल्याने बिनकसबी श्रमिकांना हे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करुन देऊ शकते. कृत्रिम मत्स्यबीजांपासून देशांतर्गत जलाशांमध्ये मोठ्या प्रमाणावर मत्स्यउत्पादन करता येऊ शकते.
भारताला अंतर्गत मत्स्योद्योगासाठी ९.५ दशलक्ष चौरस (१ लक्ष चौरस किलोमिटर) एवढी जागा उपलब्ध आहे. तसेच भारतास

७.५/७ कि.मी. लांबीचा समुद्रकिनारा उपलब्ध झालेला आहे. देशाच्या एकूण मासळीच्या उत्पादनापैकी ६१ टक्के उत्पापदन सागरी मासेमारीपासुन मिळते. भारतात सुमारे १,६०० जातींचे मासे समुद्रात व किनाऱ्यावर आढळून येतात. त्यातील ४१४ जाती महाराष्ट्रात आहेत. भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर ७० ते ७५ प्रकारचे मासे उपलब्ध होतात. यात सुरमई, पापलेट, सारंगा, बोनिटो, कॅटफिश, शिंगाळे, टुना, मुशी, घोळू अशा विविध प्रकारचे मासे आढळून येतात. सागरी मासेमारी व्यवसायात अत्यंत अनुकूल घटक म्हणजे मत्स्योउत्पादनासाठी लोकांना काहीही करावे लागत नाही. सागरातील मत्स्यनिर्मिती नैसर्गिकरीतीने होत असते. शेती पिकांच्या तुलनेने ही अत्यंत लाभादायक गोष्ट आहे. कारण विनाश्रम भारतीयांपुढे कधीही न संपणारा प्रचंड मत्स्यसाठा सतत उपलब्ध होत आहे. तसेच मत्स्यव्यवसायाने गेल्या काही वर्षात केवळ रोजगारातच भर घातली आहे असे नसून निर्यात क्षेत्रातही वाढते परकीय चलन मिळून देणारे क्षेत्र बनले आहे.

देशात मत्स्य व्यवसायामध्ये सागरी, मासे मारी बरोबरच अंतर्गत मासेमारीलाही महत्वाचे स्थान आहे. अंतर्गत मासेमारीसाठी पाव्या योजनेमध्ये मत्स्यशेती विकास संस्था (ऋऋखअ) व मत्स्य तलाव विकास संस्था स्थापन करुन अंतर्गत मासेमारीला चालना देण्यात आली. देशात जवळजवळ १७ राज्यांमध्ये १५० मत्स्यशेती विकास संस्था कार्यरत असून या सेवेअंतर्गत ३८६ हजार हेक्टर जमिनीवर मत्स्यशेती केली जाते.

देशातील मत्स्यउत्पादनात २००४ पासून २०११ पर्यंत वाढच झालेली आहे. हे उत्पादन २००४-०५ मध्ये ६,३०४ हजार टन होते ते वाढून २०१०-११ पर्यंत ८,२९६ हजार टन इतके झाले. देशात सर्वाधिक मत्स्यउत्पादन पश्चिम बंगालमध्ये होताना दिसते. २०१०-११ मध्ये पश्चिम बंगाल मधील मत्स्यउत्पादन सर्वाधिक १,६१५,३१३ हजार टन इतके झाले. पश्चिम बंगाल खालोखाल आंध्रप्रदेश मधील मत्स्यउत्पादन २०१०-११ मध्ये १,३४९.९४० हजार टन इतके झाले असल्याचे आढळून येते. देशातील मत्स्यउत्पादनात सातत्याने वाढ होत असल्याचे वरील तक्त्यावरुन दिसून येते.भारतात मत्स्योद्योगामुळे मोठ्या प्रमाणावर परकीय चलन प्राप्त होते. मासे व मासेमारी उत्पादनामुळे १९६१-६२ मध्ये १५,७०० टन माशांच्या निर्यातीमुळे ३.९२ कोटी परकीय चलन प्राप्त झाले. २००६-०७ मध्ये मासेमारी उत्पादन अंदाजे ५.६३ लाख टन झाले आणि अंदाजे ७,२९६ कोटी रुपयांची भारतीय अर्थव्यवस्थेला प्राप्ती झाली.

१९५० ते २०११ या कालावधीत देशातील सागरी व अंतर्गत मत्स्यउत्पादन व त्याच्या निर्याती पासून मिळालेली एकूण प्राप्ती खालील तक्त्यामध्ये दिलेली आहे.

**तक्ता क्र. २**
**भारतातील मत्स्य उत्पादन आणि निर्यात**

| वर्ष | उत्पादने मे. (टन) | | | सागरी उत्पादनाची निर्यात | |
|---|---|---|---|---|---|
| | सागरी | अंतर्गत | एकूण | १००० टन | किंमत (₹ कोटी) |
| १९५०-५१ | ०.५ | ०.२ | ०.७ | २० | २ |
| १९९०-९१ | २.३ | १.५ | ३.८ | १४० | ८७३ |
| २०००-०१ | २.८ | २.८ | ५.६ | ५०३ | ६,३०० |
| २००६-०७ | ३.० | ३.८ | ६.८ | ६१२ | ८,३१३ |
| २००७-०८ | २.९ | ४.२ | ७.३ | ५४१ | ७,६२० |
| २००८-०९ | २.९ | ४.७ | ७.६ | ६०२ | ८,६०८ |
| २००९-१० | ३.१ | ४.८ | ७.९ | ६७८ | १०,४८० |
| २०१०-११ | ३.२ | ५.१ | ८.३ | ८१३ | १२,९०१ |

**संदर्भ - इंडियन इकॉनॉमि, दत्त आणि सुंदरम, ६६ वी आवृत्ती, पान क्र. १०५.**

वरील तक्त्यावरुन हे स्पष्ट होते की. देशात सागरी मत्स्यउत्पादन १९५०-५१ मध्ये ०.५ मेट्रीक टन झाले होते. ते २०११ पर्यंत वाढून ३.२ इतके झाले. तसेच अंतर्गत उत्पादनाचा विचार करता १९५०-५१ मध्ये ०.२ मेट्रीक टन असलेले उत्पादन २०११ पर्यंत ५.१ मेट्रिक टनांपर्यंत पोहचले. मत्स्यउत्पादनात, या ६० वर्षातमध्ये लक्षणीय वाढ झालेली दिसून येते. तसेच या उत्पादनाची निर्यात २०१०-११ या आर्थिक वर्षात ८१३ हजार टन इतकी झाली तर या निर्यातीपासून देशाला १२,९०१ कोटी रुपयांचे परकीय चलन प्राप्त झाले. यावरु असे लक्षात येते की, देशाला मत्स्य निर्मितीपासून मोठ्या प्रमाणावर परकीय चलन मिळते.

वरील सर्व आकडेवारी व भारतातील एकूण सागरी व अंतर्गत जलसंपत्तीचा विचार केलयस असे आढळून येते की, देशात मत्स्य उत्पादन अतिशय कमी प्रमाणावर केलेम जाते. देशात मत्स्यउत्पादन वाढीला मोठा वाव आहे. देशातील एकूण जलसंपत्तीचा योग्य वापरी केलयस देशातील मत्स्यउत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ होऊ शकते आणि निर्यातीतही वाढ होऊ शकते. परंतु देशातील मत्स्योद्योगासमोरील समस्या आहेत. त्यामुळे मत्स्यउत्पादनातील वाढीस अडथळा निर्माण होतात. या समस्या व आव्हाने पुढीलप्रमाणे :

**भारतातील मत्स्यउद्योगासमोरील आव्हाने :**

१) **देशांतर्गत नद्यांतील दुषित पाणी :** देशातील अनेक नदीनाल्यांमध्ये कारखान्यांमधील दुषित व रासायनिक द्रव्ये असलेले पाणी सोडले जाते. त्यामुळे या रासायनिक द्रव्यांचा अनिष्अ प्रभाव माशांवर होऊन ते मृत पावतात. तसेच अनेक तलावांमध्ये दुषित पाणी पाझरते. त्यातील द्रव्यांमुळे अनेक तलावांमधील देखील मासे मृत होतात. याचा मोठा फटका अंतर्गत मासेमारीला बसतो. त्यामुळे असे दुषित पाणी नदीनाल्यांमध्ये सोडण्याऐवजी तयची इतर व्यवस्था करणे गरजेचे आहे.

२) **प्राथमिक स्वरुपातील मासेमारी :** देशात अनेक ठिकाणी मासेमारी ही प्राथमिक स्वरुपात केली जाते. म्हणजेच केवळ पोट भरण्याइतका पैस मिळेल अशा स्वरुपात मासेमारी केली जाते. परंतु तिथे मत्स्यउत्पादन व मासेमारीला मोठा वाव असून देखील त्याचा उपयोग केला न जाणे ही एक मोठी समस्या आहे.

३) **व्यावसायिकतेचा अभवा :** देशांतर्गत मासेमारीच्या बाबतीत व्यावसायिकतेचा अभाव आढळून येतो. प्राथमिक स्वरुपात मासेमारी केली जाते त्यामुळे माशांसाठी वेगळे खाद्य, त्याची निगा अशा व्यवसायिक मासेमारीसाठी आवश्यक घटकांचा वापर केला जात नाही. भारतात सागरी मासेमारीस प्रचंड वाव आहे. परंतु एकूण वार्षिक क्षमतेपैकी फक्त एक-तृतीयांश एवढीच मासेमारी केली जाते. सागरी मासेमारी अद्याप सागरकिनाऱ्यावरील ५० मीटर खोलीच्या समुहापुरतीच मर्यादित आहे. म्हणजेच या उद्योगासाठी उपलब्ध असलेल्या एकूण सागरी क्षेत्रफळापैकी फक्त ५% इतकेच सागरी क्षेत्र वापरले जाते.

४) **अद्यावत साधनसामुग्री व कुशल मनुष्यबळाचा अभाव :** सागरी मासेमारीचे प्रमाण एवढे कमी असण्याचे प्रमुख कारण म्हणजे सुमारे ४ लक्ष एकूण मासेमारी बोटींपैकी फक्त सुमारे १६,००० बोटी यंत्राच्या आधारे चालतात. बाकीच्या मच्छीमारी बोटी परंपरागत पध्दतीने म्हणजेच मानवी श्रमाच्या आधारे चालविल्या जातात. तसेच जुनाट जाळे व तंत्र यांचाही मोठ्या प्रमाणावर वापर होतो. त्यामुळे या व्यवयाला अद्ययावत साधनसामुग्री तसेच कुशल मनुष्यबळाचा पुरवठा आवश्यक आहे.

५) भारतात माशांच्या चांगल्या व आरोग्यदायी मत्सयबीजांचा मोठ्या प्रमाणावर अभाव आहे.

६) **निर्यात निर्देशकांचे पालन न होणे :** देशात जुनाट तंत्रज्ञान व अकुशल मनुष्यबळाच्या सहाय्याने जी मासेमारी केली जाते ती निर्यातयोग्य नसते. तेथे स्वच्छतेचा अभाव असतो. तसेच चुकीच्या पध्दतीने मत्स्यांची हाताळणी केली जाते. तसेच निर्यातीसाठी घालून दिलेली मानके व वर्गीकरणाच्या नियमांचे पालन होत नाही. त्यामुळे निर्यातीला मोठ्या प्रमाणावर वाव असूनही मत्स्यउत्पादनांची निर्यात खुप कमी होते.

७) **खोल समुद्र व सीमारेषांचे अज्ञान :** देशातील मत्स्यव्यवसाय करणाऱ्या मासेमाऱ्यांना खोल समुद्र देशाच्या पाण्याच्या सीमारेषा इत्यादीबाबत माहिती देण्याचे कोणतेही अद्ययावत तंत्रज्ञान मिळत नसल्याने मासेमारी करणारे लोक दूर समुद्रात मासेमारी करत नाहीत.

८) भारतात मासेमारी संदर्भात अद्ययावत आकडेवारी उपलब्ध करणे ही सर्वात मोठ्या समस्या आहे. त्यामुळे देशातील मत्स्यउत्पादन किती प्रमाणात झाले हे नेमके समजत नाही.

९) **शासकीय योजनांच्या माहितीचा अभाव :** देशातील मत्स्यव्यवसाय करणाऱ्या अनेक लोकांना सरकारच्या विविध योजनांची माहिती नाही. त्यामुळे सरकारच्या अनेक योजना व मासेमारी विकास संघटना जसे मत्स्यशेती विकास संस्था, मत्स्य तलाव विकास संस्था व इतर विकास संस्था असुनही मत्स्यव्यावसायिकांना त्याचा फायदा घेता येत नाही.

## संदर्भसूची :


१) Animal Husbandry, Government of India, Statistical Report, 2012-13

२) Livestock Census, Government of India Report, 2013-14

३) Indian Economy, Datta & Sundarum 66 edition, pg. no. 105.

४) भारतीय अर्थव्यवस्था, डॉ. भालेराव आणि डॉ. देसाई पान नं. २-२५,२.२६,२.२७





**डॉ. के. एच.शिंदे**

प्राचार्य, रा..ब. नारायणराव बोरावके कॉलेज, श्रीरामपूर.





**नीता मानसिंग पायगुडे**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, प्रा. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय आकुर्डी, पुणे.